Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## SOCIAL REFORMERS IN INDIA

## February -2023

ISSUE No- (CCCXCVII ) 397-C



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr Satish Sasane**
Head, Department of
Sociology Mahatma Phule
College,Ahmedpur
TQ Ahmedpur Dist.Latur , Maharashtra

**Editor**
**Dr. Baliram Pawar**
Head, Department of Sociology
Mahatma Phule College Kingaon Latur
Maharashtra

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# राजर्षीछत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य

डॉ.दयावती पाडळकर
समाजशास्त्र विभाग प्रमूख ,Email- padalkar.daya@gmail.com Mo 9850155964
सौ.उल्का पाटील, ग्रंथपाल
भारती विद्यापीठाचे, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव, जि.सांगली
Email- ulkapatil@yahoo.com, Mo.9421215838

**गोषवारा –**

बहुजन हिताय । बहूजन सुखाय । या सूत्रानुसार वाटचाल करणारे एक अत्यंत महान व दृष्टये व्यक्तीमत्व लोकराजा छत्रपती शाहू महाराज १९व्या शतकाच्या अखेरीस म्हणजे इ.सन १८९४ मध्ये कोल्हापूरला लाभलेला हा राजा अगदी जगावेगळा होता. राजर्षी शाहू महाराजानी आपल्या राजसत्तेचा उपयोग अर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाठी केला. आपल्या राजवटीच्या काळात त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी त्यांनी सढळ हातानी मदत केली. विविध जातीच्या विद्यार्थ्यासाठी वसतिगृहे काढली. राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. महाराजांच्या या धोरणामुळे बहुजन समाजातील, दलित समाजातील अनेक विद्यार्थी पूढे आले. त्यांच्या कर्तृत्वाला वाव मिळाला. राजर्षी शाहू महाराज हे पुरोगामी आणि क्रांतीकारी विचारांचे होते. त्यांनी स्पृश–अस्पृश्ता, सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सतत संघर्ष केला. अस्पृश्यांना शिक्षणाची व नोकरीची संधी उपलब्ध करून दिली. रयतेच्या कल्याणाचा हिताचा सदोदित विचार करणारा आणि त्यासाठी विविध योजना आखून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी झटणारा अत्यंत सहृदयी व लोक कल्याणकारी राजा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यमुळे देशपातळीवर लौकिक प्राप्त झाला. स्वातंत्र्यानंतर शाहू महाराजांचा जन्म दिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा करण्यात येवू लागला. शाहू महाराजांच्या शैक्षणिक विकासाची धुरा कालातंराने पुढील समाजसुधारकांनी वास्तवतेत आणली. शाहू महाराजांनी सुरू केलेली शिष्यवृत्ती योजना आज समाजातील सर्वच स्तरातील विद्यार्थ्यांना लागू करण्यात आली आहे.

**प्रस्तावना–**

शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. कागलच्या घाटगे घराण्यात झाला. वयाच्या १० व्यावर्षी म्हणजे १७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूर संस्थानात शाहूना दत्तक घेतले आणि वयाच्या अवघ्या २० व्यावर्षी म्हणजे २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्या वेळी ते म्हणाले की, जर माझी प्रजा इयत्ता ३ री पर्यत शिकलेली असते तर मला राज गादीवर बसण्याची गरजच नाही. परंतु वास्तव परिस्थिती वेगळीच आहे. हे त्यानी जाणले होते.त्यांनी आपल्या २८ वर्षाच्या कारकिर्दीत क्षण आणि क्षण वेचला तो लोकांसाठी आपल्या प्रजेसाठी. शाहू महाराज म्हणजे गोरगरिबांचा, दीनदलितांचा कनवाळू राजा म्हणून प्रसिध्द असलेले राजश्री शाहू महाराज होय. कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे वयाच्या केवळ २० व्या वर्षी हाती घेतल्यापासून सामान्या जनतेची सर्वागिण प्रगती विविध मार्गानी व शक्यतो लवकर साधावे. हे ध्येय नजरेसमोर ठेवून छत्रपती शाहू महाराजानी निष्ठापूर्वक राज्यकारभार करण्यास प्रारंभ केला आणि त्यासाठी प्रशासन, शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य, आदि क्षेत्रांत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यास तातडीने सुरवात केली. या सर्व सुधारणांमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रांतील सुधारणांना खास अग्रक्रम व प्राधान्य दिले होते. कारण जनतेच्या सर्वागिण प्रगतीचा शिक्षण हा पाया आहे. हे सत्य त्यांनी सुरवातीपासून जाणले होते. त्यावर त्यांचा नितांत विश्वास होता.

राजर्षी शाहू महाराजानी बहुजन समाजामध्ये शिक्षणाच्या अभावी माजलेली दूरवस्था पाहिली. शिक्षणाचे महत्व महाराजानी जाणले होते. त्यामुळे या समाजाला सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे ठरविले. शिक्षणाच्या महत्वाची प्रचिती त्यांच्या पुढील विचारातून दिसून येते.

१."शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम , मुत्सददी व लढवयये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिदूस्थानला अत्यंत आवश्यकता आहे"— भाषण, खामगाव (विदर्भ) येथे २७ डिसेबर १९१७

२."रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे. रयतेमधील मोठा भाग अडाणी राहिला, थोडेच लोक विद्यासंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते या थोडया लोकांच्या हाती पडणार व सुशिक्षित ब्युरोक्रसी तयार होणार. म्हणूनच खालच्या लोकांच्या बुध्दीवर व ज्ञानावर हे जे जड, जुलमी जू लादले गेले आहे, ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे" — भाषण नाशिक

३."बहुजन समाजातील शिक्षणाचा दर्जा वाढून वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने अंशत: तरी ते आल्याशिवाय सुधारणेच्या दृष्टीने माझ्या संस्थानच्या कारभारात लोकांस हक्क देण्याविषयीचा बदल करण्याला हात घालण्यास मी धजणार नाही." —भाषण नाशिक

४.माझे सर्व नागरिक निदान ३री इयत्ता पास आहेत, असे झाले म्हणजे मी आनंदाने निवृत्त होईन. सर्व सामान्य लोकांना नितिवंत बनवण्याचे साधन म्हणजे शिक्षण आहे आणि जी व्यक्ती शिक्षण घेईल ती नक्कीच जगाच्या पाठीवर यशस्वी होताना मनावर असलेले मानसिक गुलामगिरीचे जोखंड उतरवून, विचारांच्या बुरसटलेल्या कल्पना सोडून, मानवतावादी नवीन विचारांना आत्मसात करेल. हाच शिक्षणाच्या महत्तेचा धडा कोल्हापूर संस्थानात शाहू महाराज यांनी जनतेसाठी गिरवला, नुसताच गिरवला नाही तर त्या माध्यामातून सर्व सामान्य माणसांला त्यांच्या स्वत्वाची ओळख करून दिली.

समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकांना एकाच पातळीवर आणण्यासाठी वेदोक्त प्रकरणानंतर २६ जुलै १९०२ रोजी जगातील पहिला आरक्षणचा क्रांतिकारी जाहिरनामा प्रसिध्द केला. त्या ते म्हणतात, की या तारखेपासून राज्यात सर्व वर्गाच्या लोकांना शिक्षण देण्याची उदात्त हेतूसाठी त्यांना योग्य मोबदला मिळाल्यास शिक्षणाचे महत्व पटेल. म्हणून वरील तारखेपासून राज्यात रिकाम्या झालेल्या जागेपैकी ५० टक्के जागां या मागासलेल्या लोकांसाठी भराव्यात.

**सक्तीचे व मोफत शिक्षण —**

२४ नोव्हेबर १९११ पासून सर्व विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण करण्यात आले. हे करीत आसताना फक्त जाहिरनामा काढून महाराज थांबले नाहीत तर त्यांना असाही आदेश काढला की, जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठविणार नाहीत त्यांना १ रूपया दंड करण्यात येईल. त्यावेळी या योजनेखाली २७ शाळा व १२९६ मुले होती. तथापि, त्यानंतरच्या ५ वर्षाच्या कालावधीत सन १९२१—२२ पर्यंतत्यात वाढ होवून शाळांची संख्या ४२० आणि मुलांची संख्या २२००७ इतकी झाली.

त्यांच्या या मूलभूत शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये खालील तीन गोष्टीवर भर देण्यात आला असे दिसून येते.

१.विविध प्रकारच्या व वेगवेगळया स्तरावरच्या शिक्षण संस्थाची स्थापना करून नवनवीन अभ्यासक्रमांची सुरवात करून आणि विद्यार्थ्यांना मुबलक प्रमाणात सवलती देवून कोल्हापूर संस्थानात शिक्षण प्रसाराला चालना देणे.

२.विविध जाती जमातीच्या विद्यार्थ्यांच्या राहण्या जेवणाची पर्याप्त व्यवस्था करून त्यांच्या शिक्षण घेण्याच्या अडचणी दूर करण्यासाठी शहरात विद्यार्थी वसतिगृह मोहिम सुरू केली.

३.कोल्हापूर संस्थानाबाहेर विविध प्रकारच्या शिक्षण संस्थाना आर्थिक सहाय देवून सदैव मदत करणे.

**अस्पृश्यांसाठी शिक्षण —**

अस्पृश्य वर्गाला शिक्षणासारख्या मुलभूत हक्कापासून वंचित राखणे हे चुकीचे होते. अस्पृश्यांत शिक्षण विषयक जागृती निर्माण करणे आणि त्यांच्या शाळांचे आणि विद्यार्थ्यांचे संख्या वाढविणे, या गोष्टीला त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांच्या राज्यारोहण प्रसंगी ( सन १८९४) संस्थानात अवघ्या ५ शाळा अस्पृश्यांसाठी होत्या आणि त्यांत १६८ विद्यार्थी होते. १९०७ — ०८

साली ही संख्या अनुक्रमे १६ व ४१६ इतकी झाली आणि १९१२ मध्ये शाळा २७ व विद्यार्थी संख्या ६३६ इतकी झाली.

दि. २४ नोव्हेंबर १९११ रोजी महाराजांनी अत्यंत महत्वाचा आदेश काढला, तो म्हणजे संस्थानातील तो सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. याशिवाय, हुशार अस्पृश्य विद्यार्थ्यांना दरबारकडून वेळोवेळी विशेष शिष्यवृत्ती देण्याचे धोरण स्विकारले. यानंतर २८ सप्टेबर १९१९ रोजी महाराजानी आणखी एक महत्वाचा आदेश जारी केला. त्युनसार संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला. “करवीर इलाक्यात, अस्पृश्य मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात त्या सर्व शाळा येत्या दस–यापासुन बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळामधून, इतर लोकांच्या मुलाप्रमाणेच दाखल करून घ्यावे. सरकारी शाळातुन शिवाशिव पाळण्याची नसल्योन, सर्व जातीच्या व धर्माच्या मुलासं एकत्रित बसविण्यात यावे”

स्त्री शिक्षण —

शाहू महाराजांनी करवीर संस्थानात स्त्री शिक्षण विषयक अत्यंत पुरोगामी धोरण स्विकारले होते. संस्थानातील स्त्री शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाधिका–याचे विशेष पद निर्माणकेले होते. ही जबाबदारी रखमाबाई केळवकर यांच्याकडे होती. संस्थानात मुला–मुलीसाठी शाळा होत्याच. पण, मुलीसाठी स्वतंत्र शाळा निर्माण केल्या.

राजाराम कॉलेजमध्ये शिकणा–या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले. रखमाबाई यांच्याच मुलीला, कृष्णाबाई यांनी महाराजानी वैद्यकिय शिक्षणासाठी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठविले व व डॉक्टर बनविले. आणि परतल्यानंतर कोल्हापूरच्या एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त केले. पुढे त्यांना उच्च वैद्यकिय शिक्षणसाठी त्यांना इंग्लंडला पाठविले आणि उच्चविद्याविभुषित होवून पुन्हा संस्थानच्या सेवेत रूजू झाल्या. अशा प्रकारे परदेशात वैद्यकिय उच्च शिक्षण घेवून मायदेशी परतणा–या कृष्णाबाई दुस–या महाराष्ट कन्या होत. पहिल्या अर्थातच आनंदीबाई जोशी या होत.

छत्रपती शाहू महाराज गादीवर बसले तेव्हा संस्थानातील शैक्षणिक परिस्थिती असमाधान कारक होती. विविध विभागामध्ये शैक्षणिक दृष्टया तफावत होती. कारण अल्पसंख्याक ब्राम्हण समाज शिक्षित होता आणि ब्राम्हणेत्तर समाज अशिक्षित राहत होता. छत्रपती शाहू महराजानी शिक्षण क्षेत्रांत खालील प्रमूख उपाययोजना व कार्यक्रम आखले आणि ते पार पाडले.

१. कारकिर्दीच्या पहिल्या वर्षीच शिक्षण क्षेत्रातील प्रचलित परिस्थितीचा आढावा घेंवून त्यांत प्रगती सुचविण्यासाठी शिक्षण सुधार समितीची स्थापना केली.

२. प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या वाढविली.

३. राजाराम कॉलेजचे महत्व व प्रतिष्ठा वाढेल असे काम केले.

४. बहुजन समाजाच्या गरिब घरातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या पारितोषिके आदि स्वरूपात शैक्षणिक सवलती उपलब्ध करून दिल्या.

५. शाळांतील अभ्यासक्रमांची पुर्नरचना केली.

६. शाळांची निर्मिती, इमारतीची दुरूस्ती, उत्पन्न खर्च इ.संदर्भात स्पष्ट नियम घालून दिले.

७. शिक्षक निवडीसाठी निर्धारित कसोटया तयार केल्या.

८. देवस्थानांनी शैक्षणिक संस्थाना सर्वतोपरी सहाय करावे असा जाहिरनामा काढला.

९. शिक्षण कराची निर्मिती करून करवीर संस्थानातील व्यक्तीवर आणि प्रत्येक घरावंर लावण्यात आला.

१०. अस्पृश्यांच्या मुलांसाठी असलेलया स्वतंत्र शाळा बंद करून एकत्रित सर्व जाती धर्माच्या मुलासांठी शाळा सुरू केल्या.

११. गरिब विद्यार्थ्यांना पुस्तक पुरविण्यासाठी पुस्तक पेढी योजना व ग्रंथालय अनुदान योजना आखण्यात आली.

१२. मुलानां लष्करी शिक्षणाची तरतूद केली तसेच तंत्रशिक्षणाची तरतूर करण्यात आली.

१३. मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या राहण्या जेवणाची मोफत व्यवस्था १९१९ सालापासून करण्यात आली.

१४. संस्कृत शिक्षणाचा प्रसारासाठी विशेष प्रयत्न केले.
१५. शिक्षण प्रशिक्षण केंद्र १९१२ साली सुरू करण्यात आले.
१६. पाटील स्कूल १९१२ साली चालू केले.
१७. परदेशी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिले.
१८. राजाराम कॉलेजमधील विद्यार्थीनीना मोफत शिक्षणाची सुरवात केली.
१९. स्कूल पंच कमिटयाची पुर्नरचना सुरू केली.
२०. वतनदार शिक्षक योजना १९१२ साली चालू केली नंतर अडचणी लक्षात घेवून पगारी शिक्षक योजना १९१७ साली अंमलात आणली.
२१. कोल्हापूर मॅट्रिक परीक्षेचे सेंटर चालू केले.
२२. १९१२ साली आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

छत्रपती शाहू महाराजानी १९०३ मध्ये व्यवसाय शिक्षणाची आपल्या संस्थानामध्ये सुरवात केली. कोल्हापूरात ओब्रायन टेक्नीकल स्कूलची स्थापना केली. व्यावयाय शिक्षण सर्वाना मिळाले तर सर्वाची आर्थिक प्रगती होईल असे त्याचे मत होते. खेडेगावातील पाटील लोकांना सरकारी कामकाज पध्दतीचे शिक्षण देण्यासाठी दिल्ली दरबार पाटील पाठशाळा नावाची अभिवर शाळा सुरू केली. तसेच त्यांनी सत्यशोधक शाळा, विविध धार्मिक संस्कार धर्मशास्त्रांप्रमाणे कसे असावेत याचे शिक्षण देण्यासाठी चालू केली. १९१९ मध्ये श्री शिवाजी वैदिक विद्यालय वैदिक शिक्षणासाठी चालू केले.

**वसतिगृह चळवळ —**

खेडयापाडयातील बहुजन समाजातील विद्यार्थ्याच्या शिक्षणाची आभाळ होवू नये, त्यांच्या राहण्या — जेवणाची व्यवस्था असणारी वसतिगृहे स्थापन करून संस्थानातील शिक्षण व्यवस्थेला परिपूर्णत्व देण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न शाहू महाराजांन केला. सन १९०८ पर्यत लिंगायत, मुस्लीम, अस्पृश्य, सोनार , शिंपी, पांचाळ, गौड सारस्वत, इंडियन खिश्चन, चां.का.प्रभू, वैश्य, ढोर—चांभार, सुतार, नाभिक, सोमवंशीय आर्यक्षत्रिय, कोष्टी अशा विविध जातीधर्माची २० वसतिगृहे महाराजांच्या प्रेरणेने व सहायाने स्थापन झाली. छत्रपती शाहू महाराजानी वेगवेगळया जातीधर्मातील विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र वसतिगृह काढण्याची मोहिम हाती घेतली. त्यासाठी राज्यातील प्रमूख जातीच्या पुढा—यांना आणि कार्यकर्त्याना बोलवून त्यांना आपापल्या जातीतील विद्यार्थ्यासाठी वसतिगृह स्थापन करण्यासाठी प्रवृत केले. प्रत्येक व्यक्ती आपल्या जातीच्या उन्तीसाठी प्रयत्न करण्यास तयार असते. हे जाणून महाराजांनी त्यांच्याकडून जागा इमारती, पैसा, पुस्तके, अनुदान आदि स्वरूपात प्रत्यक्ष सहाय देखील मिळवून दिले.

**सारांश —**

ज्यांनी आपल्या जीवनात सर्वोच्च मूल्यांचा अंगिकार केला असा राजश्री शाहू महाराजांसारखा दुसरा समाजसुधारक वर्तमान शतकात झाला नाही व यापुढे होणारही नाही. त्यांच्या शैक्षणिक कार्यापासून पुरोगामी विचारांची प्रेरणा बहुजन समाजाच्या उध्दाराची प्रवृत्ती महाराष्टात ठिकठिकाणी स्थापन झालेल्या शिक्षण संस्था त्यांनी केलेल्या अव्याहत प्रयत्नामूळे पुढे सुरळितपणे चालू राहिल्या.

आजही महाराष्ट्रात अनेक जण स्वतःला पुरोगामी म्हणून घेतात. आपल्यावर फुले—शाहू—आंबेडकर यांचा पगडा असल्याचे मान्य करतातय मात्र त्याच महाराष्ट्रात आजही जातीयतेच्या नावावर दंगली पेटतात, लोकांना जाळतात, लोक नियोजनाअभावी उपाशी मरतात, आजही अनेकांना शिक्षणाच्या साध्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक दिव्ये पार पाडावी लागतात, आरक्षणाच्या नावावर वाद—प्रतिवाद होतात. मने कलुषित बनतात. सरकारने आजचा दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहेय मात्र यासाठी प्रत्येकाने आपल्या नैतिकतेच्या जोरावर सामाजिक न्यायाचा जागरही करणे आवश्यक आहे.

महाराजांच्या मनात सर्वसामान्य आणि गोरगरीब लोकांच्या बाबतीत असणारी तळमळ प्रत्येकाने बाळगल्यास त्यांच्या विचारांना खरीखुरी आदरांजली ठरेल. आरक्षणाचे जनक ही शाही

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, - (CCCXCVII ) 397- C
ISSN : 2278-9308
February, 2023

महाराजांची एकमेव ओळख दूर करून, त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा इत्यादी क्षेत्रांतील योगदान विसरून चालणार नाही. या क्षेत्रातील विचारांना उजाळा मिळणे काळाची गरज आहे.

1. जाधव, रमेश: राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्रशासन, मंत्रालय, मुंबई (२०१६)
2. पवार, जयसिंगराव (संपा.): राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर (द्वितियावृत्ती,२००७)
3. The Constitution of India (As on 9th November,2015),Ministry of Law and Justice, Government of India
4. Internet
5. Keer , Dhananjay ,Rajarshi Shahu Chatrapati,Popular Publication ,Mumbai (2nd Edition,1992)